# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४ (वैयक्तिक)
फॅक्स : २२०२९३४८
ई-मेल पत्ता : msmjp7@gmail.com,
वेब पत्ता : mahajeevan.com

क्र.मजीप्रा/२०१०/सभा-११६/(९५)/आ.४ दिनांक : १९.४.२०१०

प्रति,

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१.

**विषय : मंडळवार दि.३०.३.२०१० रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११६ व्या सभेचे इतिवृत्त.**

महोदय,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मंगळवार दि.३०.३.२०१० रोजी झालेल्या ११६ व्या सभेचे इतिवृत्त यासोबत पाठविण्यांत येत आहे. सदर इतिवृत्ताबाबत आपले काही अभिप्राय असल्यास, ते या कार्यालयास कृपया त्वरीत कळवावेत.

सदर अभिप्राय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आगामी बैठकीमध्ये विचारार्थ सादर करण्यांत येतील.

आपली विश्वासू,

(उ.प्र.महाजन)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

सोबत : ११६ व्या सभेचे इतिवृत्त.

(२)

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११६ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ११६ वी सभा मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. लक्ष्मणराव ढोबळे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक ३०/३/२०१० रोजी संपन्न झाली. या सभेस मजीप्राचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा.ना.श्री.लक्ष्मणराव ढोबळे, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. मा.ना.श्री.जयंत पाटील, मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह-अध्यक्ष.
३. मा.श्री.रणजित कांबळे, राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
४. मा.प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य पा.पु. व स्व. विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५. प्रधान सचिव, (वित्तीय सुधारणा ) वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.शि.म.म्हात्रे, उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. प्रधान सचिव, उर्जा, तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.सी.के. जाधव, उप सचिव, उर्जा, मंत्रालय, मुंबई-३२
७. श्री. संजय दहासहस्त्र, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.

या व्यतिरिक्त सदर सभेस मजीप्राचे खालील अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.

१. श्री.हेमंत चं. लांडगे, मुख्य अभियंता, मजीप्रा प्रादे.विभाग, ठाणे
२. श्री.व्ही.आर.कल्याणकर, मुख्य अभियंता, मजीप्रा प्रादे.विभाग, पुणे
३. श्री.एन.एस.केरकर, मुख्य अभियंता, मजीप्रा प्रादे.विभाग, नाशिक
४. श्री.व्ही.एन. राठोड, मुख्य अभियंता, म.जी.प्रा.प्रादे. विभाग, नागपूर.
५. श्री.प्र.वा.पांढरीपांडे, वि.स. व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
६. सौ.उषा प्र. महाजन, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., मुंबई.
७. श्री.दु. चंद्रिकापूरे, उप सचिव (आस्थापना), पा.पु. व स्व. विभाग, मंत्रालय, मुंबई
८. श्री.बी.के.सवाई, अधीक्षक अभियंता (मुख्यालय), म.जी.प्रा., मुंबई.
९. श्री. बा.शि. पाटील, उप मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.
१०. श्री.सु.रा. भोसले, उप मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

संजय दहासहस्त्र
सदस्य सचिव
म.जी.प्रा.

१८०।५ ३

मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र.१ : महाराष्ट्र ज़ीवन प्राधिकरणाच्या ११५ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

दिनांक २४.११.२००९ रोजी संपन्न झालेल्या ११५ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.२ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११५ व्या सभेतील निर्णयावर करण्यात आलेली कृती**

महाराष्ट्र जीवंन प्राधिकरणाच्या दिनांक २४/११/२००९ रोजी संपन्न झालेल्या ११५ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले होते, त्या निर्णयाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

तत्कालीन आयत्यावेळेच्या कार्यक्रम बाबीतील बाब क्र.५ संदर्भात मा.अध्यक्ष, यांनी प्राधिकरणाच्या मालकीच्या मोकळया जागेवर खाजगी संस्थेच्या सहभागाने वॉटर हबची निकर्मती बाबत पुढे काय कार्यवाही केली, अशी विचारणा केली असता, मा.सदस्य सचिव, यांनी असे सूचित केले की, पनवेल येथे राष्ट्रीय महामार्गालगत म.जी.प्रा.च्या मालकीची ५७५२६ चौ.फूट इतकी जागा असून त्या जागेवर म.जी.प्रा.च्या मार्फत सिंगापूरच्या धर्तीवर वॉटर हबची निर्मिती करण्याबाबतचा प्रस्ताव म.जी.प्रा.च्या विचाराधीन आहे. त्यामुळे म.जी.प्रा.चे अध्यक्ष यांचा सिंगापूर येथील वॉटर हबचा पाहणी दौरा माहे जून २०१० मध्ये आयोजित करण्याचा प्रस्ताव आहे. यावर मा.अध्यक्ष यांनी असे निर्देश दिले की, मा.मंत्री, ग्राम विकास तथा म.जी.प्रा.चे सह अध्यक्ष व मा.राज्यमंत्री, पा.पु.व स्व. तथा म.जी.प्रा.चे उपाध्यक्ष, यांचा एकत्रित सिंगापूर दौरा आखावा. तद्नंतर उपरोक्त मंत्री महोदयांच्या निर्णयानुसार महाराष्ट्रामध्ये त्याच धर्तीवर वॉटर हबची निर्मिती करुन राज्यातील जनतेस शुध्द पाणी पुरवठा कसा होईल याकडे कटाक्षाने पाहता येईल, त्यानुसार सुधारित कार्यक्रम बाब पुढील बैठकीसमोर ठेवावी, असे सर्वानुमते ठरले.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

कार्यक्रम बाब क्र.३ : राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळण्याबाबत..

सदर कार्यक्रम बाबीतील मुद्दयांबाबत मा. सदस्य सचिव यांनी बैठकीमध्ये उहापोह केला. या संदर्भात मा.अध्यक्ष, यांनी मागील बैठकीत ज्या सूचना केल्या होत्या त्या विचारात घेतल्या आहेत का याबाबत चौकशी केली. यावर सदस्य सचिव यांनी असा खुलासा केला की, मा. अध्यक्षांनी ज्या सूचना केल्या होत्या त्या संदर्भात कार्यक्रम बाबच सादर केली आहे. त्यामध्ये ९६ व्या बैठकीत ठरलेल्या अल्प मुदतीच्या गुंतवणूकीसाठी निर्णय घेण्यासाठीच्या समितीमध्ये बदल करण्याचे प्रस्तावित केले आहे. यावर चर्चा होऊन पुढील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**असा ठराव करण्यात येतो की,**

(१) तद्नंतर दिनांक १.११.२००९ व १५.३.२०१० या कालावधीमध्ये अल्प मुदतीसाठी केलेल्या गुंतवणूकीस मान्यता देण्यात आली.

(२) ९६ व्या बैठकीत अल्प मुदतीच्या गुंतवणुकीवर निर्णय घेण्यासाठी जी समिती गठीत केली होती त्यामध्ये बदल करुन पुढील प्रमाणे समितीचे पुनर्गठन करण्यात यावे.

(अ) २०० दिवसांपर्यंतच्या अल्प मुदतीची गुंतवणूक करण्यासाठी :
(१) सदस्य सचिव, म.जी.प्रा.
(२) वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, म.जी.प्रा.

यांची समिती असावी.

(ब) २०१ दिवसांपासून ते ३६४ दिवसांपर्यंतच्या अल्प मुदतीची गुंतवणूक करण्यासाठी :
(१) मा. मंत्री, पा.पु. व स्व. विभाग तथा अध्यक्ष मजीप्रा - समितीचे अध्यक्ष
(२) प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग - समितीचे सदस्य
(३) सदस्य सचिव, मजीप्रा - समितीचे सदस्य
(४) वि.स. व मु.ले. अ., मजीप्रा - समितीचे सदस्य .

याप्रमाणे समितीची रचना असावी.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.४ : सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या भविष्य निर्वाह निधी वर्गणी धारकांचे भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये वेतनाच्या थकबाकीचे हप्ते जमा करणे. त्यावरील व्याज आकारणी व उचलीवर प्रतिबंध.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आर्थिक स्थितीबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली. सदरचा विषय स्थगित ठेऊन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील अतिरिक्त कर्मचाऱ्यांबाबत आढावा घेऊन हा विषय पुढील बैठकीत सादर करावा, असे सर्वानुमते ठरले.

**कार्यक्रम बाब क्र.५: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेत १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजनेच्या कार्यपध्दतीची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून अंमलबजावणी..**

या कार्यक्रम बाबीबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास सविस्तर माहिती दिली आणि सर्वसाधारण चर्चेनुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली. त्यानुसार शासनाप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण "अभिलेख देखभाल अभिकरण" वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, सिडको भवन, नवी मुंबई, यांच्या प्रशासकीय अधिपत्याखाली कार्य करावे आणि प्रस्तावाप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेच्या कार्यपध्दतीची योग्य ते फेरफार करुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून अंमलबजावणीस मान्यता देण्यात आली. भविष्यामध्ये शासनाने त्यांच्या शासकीय योजनेत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास समाविष्ट करुन संमती दिल्यास त्याप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे अशा सर्व अंशदानधारकांच्या खाती जमा असलेली रक्कम व्याजासह शासकीय योजनेमध्ये वर्ग करण्यांचे निश्चित झाले.

**कार्यक्रम बाब क्र.६ : दिघी बंदर व इतर गावांची नळ पाणी पुरवठा योजना (ता. श्रीवर्धन, जि.रायगड) म.जी.प्रा.ने १० % गुंतवणूक करुंन मजीप्राची योजना म्हणून राबविणेबाबत..**

ठाणे महसूल विभागांतर्गत दिघी बंदर व इतर गावांची नळ पाणी पुरवठा योजना, म.जी.प्रा.ने १०% गुंतवणूक करुन मजीप्राची योजना म्हणून राबविणेबाबतची सदरची कार्यक्रम बाब असून संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत असल्याबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

सदर कार्यक्रम बाबीवर सांगोपांग चर्चा करण्यात आली. सदर चर्चेअंती या योजनेच्या अनुषंगाने Cash flow तयार करण्यात यावा, त्याचप्रमाणे योजना कशी Sustainable आहे ते स्पष्ट करणारी कागदपत्रे तयार करुन मा.प्रधान सचिव, पा.पु.व स्व.वि. यांना सादर करण्यात यावीत, असे निर्देश देण्यात आले. या अनुषंगाने योग्य ती पुढील कार्यवाही करण्यास मा.प्रधान सचिव, यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.७. नायगांव व ९ गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता. सिन्नर जि. नाशिक योजनेची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करणेबाबत..**

नाशिक महसूल विभागांतर्गत म.जी.प्रा. मार्फत पूर्ण करुन कार्यान्वित केलेली मात्र, जिल्हा परिषद नाशिक, यांनी हस्तांतरित करुन न घेतलेली, नायगांव व ९ गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती म.जी. प्राधिकरणामार्फत करणेबाबतची सदरची कार्यक्रम बाब संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत असल्याचे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

सदरची योजना पुर्नजिवित करण्यासाठी रु.९९.८५ लक्ष इतका खर्च येणार असून तो योजनेच्या बचतीतून करावयाचा असून योजना प्रथमतः ५ वर्षासाठी म.जी.प्रा. मार्फत ग्राहकापर्यंत पाणी पुरवठा करुन पाणीपट्टी वसुलीसह देखभाल दुरुस्ती करावयाची आहे. यासाठी आवश्यक पाणीपट्टीचे दर निश्चित केले असून, पुढे आवश्यकतेनुसार पाणी पुरवठा केंद्रावर होणाऱ्या खर्चाचा आढावा घेऊन पाणीपट्टीचे दर सुधारित करण्यात येणार आहेत.

सदर कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

१. नाशिक बांधकाम विभागामार्फत पूर्ण करण्यात आलेली व जिल्हा परिषदने हस्तांतरीत न करुन घेतल्याने व सद्यःस्थितीत बंद असलेली नायगांव व ९ गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, प्रथमतः ५ वर्ष देखभाल व दुरुस्तीसाठी वसुली व्यवस्थापनासह थेट ग्राहकांपर्यंत पाणी पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने चालविण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

२. योजना पुर्नजिवित करणेसाठी लागणारा खर्च रु ९९.८५ (निव्वळ) लक्ष, योजनेच्या बचतीतून खर्च करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

३. नायगांव प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतून पाणी पुरवठा करण्यात येणा-या ग्राहकांना आकारावयाच्या उपरोक्त प्रस्तावित केलेल्या पाण्याचा दरास मान्यता देण्यात येत आहे. मात्र वेळोवेळी या पा.पु.केंद्रावर होणा-या खर्चाचा आढावा घेऊन, त्याप्रमाणात पाणीपट्टीत दर सुधारित करण्यात यावेत.

४. ग्राहकांसोबत आवश्यक तो करारनामा करण्यात यावा.

या अनुषंगाने पुढील कार्यवांही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.८. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्रातून होणाऱ्या पाणी पुरवठयाच्या दराचा सन २०१०-११ साठी आढावा.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्रातून होणाऱ्या पाणी पुरवठयाचे दराचा सन २०१०-११ या वर्षाचा आढावा घेण्यात आला. पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी जे ग्राहक प्रमाणापेक्षा जास्त पाण्याचा वापर करतात, त्यांच्यासाठी प्रमाणापेक्षा जास्त वापरासाठी जास्तीचे दर लावणे (Telescopic Tarrif) प्रस्तावित आहे. प्राधिकरणातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाचे फायदे लागू करण्यात आल्याने आर्थिक भारामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. आणि त्यामध्ये दरवर्षी वाढ होणार आहे. हा अतिरिक्त भार भागविण्यासाठी सध्याचा पाणी पुरवठ्याचा दर १०% नी वाढविणे प्रस्तावित आहे.

मा. सदस्य सचिव यांनी सदर कार्यक्रम बाबीबाबत संचालक मंडळास अवगत केले. सदर कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा होऊन सादर केलेल्या प्रस्तावास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली व त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

**असा ठराव करण्यांत येतो की, प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्रातून होणा-या पाणी पुरवठयाचे दर पुढे नमुद केल्या प्रमाणे दिनांक १/५/२०१० पासून अथवा सदस्य सचिव ठरवतील त्या दिनांकापासून आकारण्यात यावेत.**

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

[एक] जलमापक यंत्राद्वारे पाणी पुरवठा

ठोक पाणी पुरवठा

(पाण्याचे दर रुपयात प्रती १००० लिटर)

| क्र. | तपशिल | पाण्याचा दर |
|---|---|---|
| १. | घाऊक पाणी पुरवठा | |
| अ] | घरगुती | |
| i] | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाकडे वीज देयके परस्पर भरणा-या नगरपालिकांना केलेला घाऊक पाणी पुरवठा | ५.१० |
| ii] | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाकडे वीज देयके न भरणा-या नगरपालिकांना केलेला घाऊक पाणी पुरवठा | १०.२० |
| iii] | मुख्य वितरण नलिकेतून प्रतिमहा २ द.ल.लिटर पेक्षा जास्त पाणी घेणारे ग्राहक | १०.२० |
| iv] | ग्रामीण भागासाठी [ग्रामपंचायत व जिल्हा परिषद] घाऊक घरगुती पाणी पुरवठा | ५.१० |
| ब] | बिगर घरगुती | |
| i] | बिगर घरगुती घाऊक | ५०.८० |
| ii] | ग्रामीण भागासाठी [ग्रामपंचायत व जिल्हा परिषद] घाऊक बिगरघरगुती पाणी पुरवठा | २४.८० |
| क] | विशेष ग्राहक | |
| | लष्करी कारखान्यांना केलेला शुध्द पाणी पुरवठा | |
| अ] | अंबाझरी | २०.६० |
| ब] | ओझर | २०.६० |
| क] | अणुशक्ती केंद्र तारापूर | २०.६० |

किरकोळ पाणी पुरवठा

(पाण्याचे दर रुपयात प्रती १००० लिटर)

| अ. क्र. | | तपशिल | पाण्याचा वापर १०५०० लि. पर्यंत | पाण्याचा वापर १०५०१ ते २०००० लि. पर्यंत | पाण्याचा वापर २०००१ ते २५००० लि. पर्यंत | पाण्याचा वापर २५००१ लि. व त्यापुढे |
|---|---|---|---|---|---|---|
| (२) | | किरकोळ पाणी पुरवठा | | | | |
| अ] | | घरगुती | | | | |
| | (i) | निवासस्थाने | ११.२० | १६.८० | २२.४० | २८.०० |
| | (ii) | ग्रामीण भागासाठी किरकोळ घरगुती पाणी पुरवठा | ५.२५ | ७.८० | १०.४० | १३.०० |
| ब] | | बिगर घरगुती | | | | |
| | (i) | क वर्ग नगरपालिकेला क्षेत्राशिवाय इतर नगरपालिका क्षेत्रात केलेला बिगर घरगुती पाणी पुरवठा | ५०.८० | ७६.२० | १००.०० | १२५.०० |
| | (ii) | क वर्ग नगरपालिका क्षेत्रात २ द.ल.लि. पर्यंत पाणी वापर करणा-या बिगर घरगुती ग्राहकासाठी पाणी पुरवठा | ३१.८० | ४७.७० | ६३.६० | ८०.०० |

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| (३) | | शाळा, महाविदयालय, धर्मादाय संस्था, सरकारी व निमसरकारी कार्यालय, सरकारी रुग्णालय यासारख्या ना नफा ना तोटा तत्वावर चालणा-या संस्थाना केलेला पाणी पुरवठा | २१.६० | ३२.४० | ५२.०० | ६२.८० |
| (४) | | गिरीस्थाने | | | | |
| | (i) | घरगुती | १२.४५ | १८.७० | २५.०० | ३१.२५ |
| | (ii) | बिगर घरगुती | | | | |
| | (a) | अ वर्ग हॉटेल्स | ९५.६० | १४३.४० | १९१.०० | २३९.०० |
| | (b) | ब वर्ग हॉटेल्स | ७६.२० | ११४.३० | १५२.४० | १९०.०० |
| | (c) | क वर्ग हॉटेल्स | ६४.१० | ९६.१५ | १२८.२० | १६०.२५ |
| | (d) | इतर | ६४.१० | ९६.१५ | १२८.२० | १६०.२५ |

**[दोन] जलमापन यंत्र बसविण्यांत आलेल्या नळ जोडण्यासाठी प्रतिमाह किमान दर रुपयात.**

ज्या नळ जोडावर जलमापनयंत्र बसविले असतील, परंतू घर बंद असल्यामुळे त्या बंद करण्याबाबत कळविले असेल अशा, तसेच ज्या ग्राहकांकडून वसुल करावयाचे मासिक आकार खाली दर्शविलेल्या रक्कमेपेक्षा कमी असेल अशा ग्राहकांच्या बाबतीत खालील किमान आकार आकारण्यात यावे.

**किमान आकार** [रुपये]

| नळ जोडाचा व्यास | किरकोळ घरगुती वापरासाठी प्रति नळ जोडास प्रतिमाह | | उपरोक्त ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संस्थांसाठी प्रति नळ जोडास प्रतिमाह | किरकोळ बिगर घरगुती प्रति नळ जोडास प्रतिमाह |
|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ |
| | शहरी | ग्रामीण | | |
| १५ मिलीमिटर | ११० | ५५ | २३१ | ५३९ |
| २० मिलीमिटर | २२६ | १०५ | ४५७ | १०६७ |
| २५ मिलीमिटर | ४२४ | २०४ | ९०८ | २१४० |
| ३२ मिलीमिटर | ६४४ | ३०८ | १३५३ | ३३०० |
| ४० मिलीमिटर | ८७५ | ४०७ | १८१५ | ४२६३ |
| ५० मिलीमिटर | ११०० | ५०६ | २२५० | ५३४१ |
| ६५ मिलीमिटर | १३९७ | ६४९ | २९३७ | ६९४१ |

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**[तीन] जलमापन यंत्र बसविण्यात आलेल्या गिरीस्थानक जोडण्या प्रतिमाह प्रति जोडणी दर रुपयातः**

[रुपये]

| नळ जोडाचा व्यास | किरकोळ घरगुती वापरासाठी प्रति नळ जोडास प्रतिमाह | बिगर घरगुती वापरासाठी प्रति नळजोडास प्रतिमाह | | | इतर ग्राहकांना बिगर घरगुती वापरासाठी प्रति नळजोडास प्रतिमाह |
|---|---|---|---|---|---|
| | | अ वर्ग | ब वर्ग | क वर्ग | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १५ मिलीमिटर | १२७ | ११४४ | ८५८ | ६९९ | ५३९ |
| २० मिलीमिटर | २३१ | २२२२ | १६५० | ११८८ | १०७३ |
| २५ मिलीमिटर | ४५१ | ४४५० | ३३०० | २५१९ | २१४० |
| ३२ मिलीमिटर | ६२७ | ६७३२ | ५०८२ | ३७७३ | ३३०० |
| ४० मिलीमिटर | ९०८ | ८३८८ | ६६०६ | ४८९५ | ४२६३ |
| ५० मिलीमिटर | ११८८ | १११८२ | ८२६१ | ६०७८ | ५३४६ |
| ६५ मिलीमिटर | १५४० | १४६१४ | १०६७० | ७८९८ | ६९४१ |

**[चार] जलमापन यंत्र बंद असलेल्या नळ जोडणीस किमान आकार दर प्रतिमाह प्रति जोडणी दर रुपयांत :**

सर्व नळजोडावर मापनयंत्र असावेत मात्र जेथे मापनयंत्र बसविलेले असतील परंतू तीन महिन्यापेक्षा अधिक काळ चालू स्थितीत नसतील अशा प्रकरणी व मागील तीन महिन्याचे सरासरी देयक खालील किमान आकारापेक्षा कमी असेल, पुढे दर्शविल्या प्रमाणे किमान आकार आकारण्यांत यावेत. तीन महिन्यांचे सरासरी देयक किमान आकारापेक्षा अधिक होत असल्यास सरासरी देयक आकारण्यात यावेत.

[रुपये]

| नळजोडाचा व्यास | घरगुती | उपरोक्त ४ मध्ये नमुद केलेल्या ना नफा तत्वावर चालणा-या सस्थांसाठी | बिगर घरगुती |
|---|---|---|---|
| १५ मिलीमिटर | ३३० | ५०६ | १२७१ |
| २० मिलीमिटर | ५०६ | १००७ | २५४१ |
| २५ मिलीमिटर | ९७९ | २५४१ | ५१०४ |

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

[पाच] गिरीस्थानकासाठी किमान आकार प्रतिमाह प्रति नळ जोडास दर रुपयात:

| नळजोडाचा व्यास | किरकोळ घरगुती वापरासाठी प्रति नळजोडास प्रतिमाह | | बिगर घरगुती वापरासाठी प्रति नळजोडास प्रतिमाह | | |
|---|---|---|---|---|---|
| | शहरी | ग्रामीण | अ वर्ग | ब वर्ग | क वर्ग |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १५ मिलीमिटर | २७५ | १२१ | २६६८ | १९६९ | १५५७ |
| २० मिलीमिटर | ५३९ | २३७ | ५७२० | ४२८५ | ३२१८ |
| २५ मिलीमिटर | १०६७ | ४६२ | १०३२४ | ७७५० | ६१०५ |

[सहा] मापनयंत्र विरहित सार्वजनिक नळखांब्याच्या जोडण्यासाठी किमान आकार:

अ]

| | | | |
|---|---|---|---|
| अ | १५ मिलीमिटर | सार्वजनिक नळ खांब | रु. २०३५ प्रतिमाह |
| ब | २० मिलीमिटर | सार्वजनिक नळ खांब | रु. ४८९५ प्रतिमाह |
| क | २५ मिलीमिटर | सार्वजनिक नळ खांब | रु. १०४९३ प्रतिमाह |

[ब] जेथे सावजनिक नळ जोडणीस मापनयंत्र बसविण्याची व देखभालीची जबाबदारी ही मालकाची असेल, बसविलेले मापन यंत्र तीन महिन्यापेक्षा अधिक काळ ना दुरुस्ती असतील तर, मागील तीन महिन्याचे सरासरी वापर किंवा मापन यंत्र नसलेल्या सार्वजनिक खांबा यापैकी जास्त असेल ते बील आकारण्यात येईल.

[सात] ठोक पुरवठयासाठी किमान आकार:

ठोक पुरवठयाच्या बाबतीत किमान मासिक आकार करारामध्ये नमूद केल्याप्रमाणे असतील, तथापि असे किमान आकार दरमहा २ दश लक्ष लिटर्स पाणी पुरवठयासाठी प्रत्येक जोडणीमागे घेण्यात येणा-या आकारापेक्षा कमी असता कामा नये.

[आठ] त्वरीत प्रदानाकरीता रिबेट:

१. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील विभाग ४४[अ] अन्वये देयक वितरीत झालेपासून १५ दिवसांचे आंत देयकाचे प्रदान ग्राहकाने करणे आवश्यक आहे. जे ग्राहक देयकाचे प्रदान १० दिवसांचे आंत करतील त्यांना देयकाच्या २% रिबेट देण्यांत येईल.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

२. ज्या ग्राहकाकडे थकबाकी नाही अशा ग्राहकांना पुढील बारा महिन्याचे अंदाजित आकार आगाऊ भरतील त्यांना आगाऊ भरलेल्या रक्कमेवंर ५ (पाच) टक्के सूट देण्यात येईल. अंदाजित देयके मागील दोन महिन्याच्या सरासरी वापरावर असेल.

[नऊ] **विलंब आकार:**

जे ग्राहक देयक दिल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत पाण्याचे बील [थकबाकीसह] भरण्यास कसुर करतील, अशा ग्राहकांना देयक देण्यात आलेल्या दिनांकापासून १५ दिवसाचा कालावधीत संपेल, त्या दिनांकापासून त्यांच्या सर्व रक्कमेवर [थकबाकीसह] दरमहा १ टक्के दराने विलंब शुल्क आकारण्यात येईल. ग्राहकांने सतत सहा महिने विलंब शुल्काचा आकार भरणा करण्यास कसूर केल्यास त्याला होणारा पाणी पुरवठा बंद करण्यास तो पात्र ठरेल.

**कार्यक्रम बाब क्र ९. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या प्रकल्प क्षेत्रातील (अंबरनाथ-बदलापूर ) पाणी पुरवठा केंद्रातून होणाऱ्या पाणी पुरवठयाच्या दराचा सन २०१०-११ साठी आढावा.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या प्रकल्प क्षेत्रातील (अंबरनाथ-बदलापूर) पाणी पुरवठा केंद्रातून होणाऱ्या पाणी पुरवठयाचे दराचा सन २०१०-११ या वर्षाचा आढावा घेण्यात आला. पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी जे ग्राहक प्रमाणापेक्षा जास्त पाण्याचा वापर करतात, त्यांच्यासाठी प्रमाणापेक्षा जास्त वापरासाठी जास्तीचे दर लावणे (Telescopic Tarrif) प्रस्तावित आहे. प्राधिकरणातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाचे फायदे लागू करण्यात आल्याने आर्थिक भारामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. आणि त्यामध्ये दरवर्षी वाढ होणार आहे. हा अतिरिक्त भार भागविण्यासाठी सध्याचा पाणी पुरवठ्याचा दर १०% नी वाढविणे प्रस्तावित आहे.

मा. सदस्य सचिव यांनी सदर कार्यक्रम बाबीबाबत संचालक मंडळास अवगत केले. सदर कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा होऊन सादर केलेल्या प्रस्तावास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली व त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

ठराव :

असा ठराव करण्यांत येतो की, प्रकल्प क्षेत्राअंतर्गतअंबरनाथ-बदलापूर पाणी पुरवठा केंदातून होणा-या पाणी पुरवठयाचे दर पुढे नमुद केल्या प्रमाणे दिनांक १/५/२०१० पासून अथवा सदस्य सचिव ठरवतील त्या दिनांकापासून आकारण्यात यावेत.

[एक] जलमापक यंत्राद्वारे पाणी पुरवठा

ठोक पाणी पुरवठा

(पाण्याचे दर रुपयात प्रती १००० लिटर)

| अ. क्र. | तपशिल | पाण्याचा दर |
|---|---|---|
| १. | ठोक पाणी पुरवठा | |
| अ] | घरगुती | ८.०० |
| ब] | बिगर घरगुती | ३३.०० |
| २. | विषेश ग्राहक | |
| | आयुध निर्माण कारखाना | १८.१५ |

किरकोळ पाणी पुरवठा

| अ. क्र. | तपशिल | | पाण्याचा वापर १०५०० लि. पर्यंत | पाण्याचा वापर १०५०१ ते २०००० लि. पर्यंत | पाण्याचा वापर २०००१ ते २५००० लि. पर्यंत | पाण्याचा वापर २५००१ लि. व च्यापुढे |
|---|---|---|---|---|---|---|
| ३. | | किरकोळ पाणी पुरवठा | | | | |
| | (i) | घरगुती | ८.३५ | १२.५० | १६.७० | २१.०० |
| | (ii) | बिगर घरगुती | ३८.१० | ५७.१५ | ७६.०० | ९५.०० |
| ४. | | शाळा, महाविदयालय, धर्मादाय संस्था, सरकारी व निमसरकारी कार्यालय, सरकारी रुग्णालय यासारख्या ना नफा ना तोटा तत्वावर चालणा-या संस्थाना केलेला पाणी पुरवठा | १८.१५ | २७.१५ | ३६.३० | ४५.४० |

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

## [दोन] जलमापन यंत्र बसविण्यांत आलेल्या व चालू असलेल्या नळ जोडण्यासाठी प्रतिमाह किमान दर रुपयात.

ज्या नळ जोडावर जलमापनयंत्र बसविले असतील, परंतू घर बंद असल्यामुळे त्या बंद करण्याबाबत कळविले असेल अशा, तसेच ज्या ग्राहकांकडून वसुल करावयाचे मासिक आकार खाली दर्शविलेल्या रक्कमेपेक्षा कमी असेल अशा ग्राहकांच्या बाबतीत खालील किमान आकार आकारण्यात यावे.

**किमान आकार**
[रुपये]

| नळ जोडाचा व्यास | किरकोळ घरगुती वापरासाठी प्रति नळ जोडास प्रतिमाह | उपरोक्त ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संस्थांसाठी प्रति नळ जोडास प्रतिमाह | किरकोळ बिगर घरगुती प्रति नळ जोडास प्रतिमाह |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १५ मिलीमिटर | १५४ | ३५८ | ६८८ |
| २० मिलीमिटर | २८१ | ६५५ | १२७१ |
| २५ मिलीमिटर | ४१३ | ८१४ | १८४३ |
| ३२ मिलीमिटर | ६११ | १४२५ | २७३४ |
| ४० मिलीमिटर | १०६२ | २४८१ | ४७७४ |
| ५० मिलीमिटर | १३४८ | ३१२४ | ६०३९ |
| ६५ मिलीमिटर | १६५० | ३८३९ | ७४०९ |

## [तीन] जलमापन यंत्र बंद असलेल्या नळ जोडणीस किमान आकार प्रतिमाह प्रति नळ जोडास दर रुपयांत :

सर्व नळजोडावर जलमापनयंत्र असावेत, मात्र जेथे जलमापनयंत्र बसविलेले असतील परंतू तीन महिन्यापेक्षा अधिक काळ चालू स्थितीत नसतील अशा प्रकरणी व मागील तीन महिन्याचे सरासरी देयक खालील किमान आकारापेक्षा कमी असेल, पुढे दर्शविल्या प्रमाणे किमान आकार आकारण्यांत यावेत. तीन महिन्यांचे सरासरी देयक किमान आकारापेक्षा अधिक होत असल्यास सरासरी देयक आकारण्यात यावेत.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

[रुपये]

| नळजोडाचा व्यास | घरगुती | उपरोक्त ४ मध्ये नमुद केलेल्या ना नफा तत्वावर चालणा-या सस्थांसाठी | बिगर घरगुती |
|---|---|---|---|
| १५ मिलीमिटर | २०९ | ४१३ | ९१३ |
| २० मिलीमिटर | ३५८ | ७१५ | १६१७ |
| २५ मिलीमिटर | ७३७ | १४७४ | ३३०० |

**[चार] सार्वजनिक नळ, खांब :-**

सध्या सार्वजनिक नळ खांबे नाहीत आणि यापुढे नवीन नळ खांब मंजूर करण्यात येऊ नये.

**[पाच] ठोक पुरवठयासाठी किमान आकार:**

ठोक पुरवठयाच्या बाबतीत किमान मासिक आकार करारामध्ये नमूद केल्याप्रमाणे असतील तथापि असे किमान आकार दरमहा २ दशलक्ष लिटर्स पाणी पुरवठयासाठी प्रत्येक जोडणीमागे घेण्यात येणा-या आकारापेक्षा कमी असता कामा नये.

**[सहा] त्वरीत प्रदानाकरीता रिबेट:**

१. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील विभाग ४४[अ] अन्वये देयक वितरीत झालेपासून १५ दिवसांचे आंत देयकाचे प्रदान ग्राहकाने करणे आवश्यक आहे. जे ग्राहक देयकाचे प्रदान १० दिवसांचे आंत करतील त्यांना देयकाच्या २% रिबेट देण्यांत येईल.

२. ज्या ग्राहकाकडे थकबाकी नाही, अशा ग्राहकांना पुढील बारा महिन्याचे अंदाजित आकार आगाऊ भरतील, त्यांना आगाऊ भरलेल्या रक्कमेवर ५ (पाच) टक्के सूट देण्यात येईल. अंदाजित देयक मागील दोन महिन्याच्या सरासरी वापरावर असेल.

**[सात] विलंब आकार :**

जे ग्राहक, देयक दिल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत पाण्याचे बील [थकबाकीसह] भरण्यास कसुर करतील, अशा ग्राहकांना देयक देण्यात आलेल्या दिनांकापासून १५ दिवसाचा कालावधीत संपेल, त्या दिनांकापासून त्यांच्या सर्व रक्कमेवर [थकबाकीसह] दरमहा १ टक्के द्राने विलंब शुल्क आकारण्यात येईल. ग्राहकांने सतत सहा महिने विलंब शुल्काचा आकार भरणा करण्यास कसूर केल्यांस, त्याला होणारा पाणी पुरवठा बंद करण्यास तो पात्र ठरेल.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र १०. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २००८-०९ चे वार्षिक लेखे स्विकृत होणेबाबत..**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यास मान्यता मिळण्याची सदरची कार्यक्रम बाब सादर करण्यात आली. सदर बाबीबाबत सदस्य सचिव यांनी अवगत केले. वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी सन २००७-०८ या वर्षामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेस सूट दिल्या कारणाने तूट दिसत असल्याची बाब स्पष्ट केली. कर्ज निवारण निधीमध्ये रक्कम वळती करण्यासंबंधीची बाब देखील विषद करण्यात आली.

अंतिमतः सन २००८-०९ चे लेखे स्वीकृत करण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र ११ :महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २००९-१० चे सुधारित अंदाज व सन २०१०-११ चे अर्थसंकल्पीय अंदाज.**

सदस्य सचिव यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २००९-१० चे सुधारित अंदाज व सन २०१०-११ चे अर्थसंकल्पीय अंदाज संचालक मंडळासमोर सादर केले. सदर अंदाजपत्रकामध्ये महसूलात रु. ५.३२ कोटीची तूट दिसते. सदर तूट सध्याचे कर्मचारी अधिकाऱ्यांचे Redeployment करुन तसेच जास्तीत जास्त नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजना चालविण्यास घेऊन उत्पन्न वाढवून कमी करण्याचा प्रस्ताव असल्याचे मा. सदस्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी स्पष्ट केले. अंतिमतः सादर केलेल्या कार्यक्रम बाबीस मान्यता प्रदान करण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**आयत्यावेळेची कार्यक्रम बाब क्र.१: नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनेचे पाणी, स्त्रोतापासून डंकिन जलशुध्दीकरण केंद्र व काबरानगर जलशुध्दीकरण केंद्र येथे घेऊन पाण्याच्या टाक्यापर्यंत आणण्याचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करार पध्दतीने हाती घेणे बाबत..**

औरंगाबाद महसूल विभागांतर्गत, नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या मालकीच्या अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनेंतर्गत स्त्रोतापासून डंकिन जलशुध्दीकरण केंद्र व काबरानगर जलशुध्दीकरण केंद्र येथे

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

घेऊन पाण्याच्या टाक्यापर्यंत आणण्याचे काम म.जी.प्रा. प्राधिकरणामार्फत करार पध्दतीने हाती घेण्याबाबतची विनंती नांदेड महानगरपालिकेने म.जी.प्रा.कडे केली आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने क्षेत्रीय कार्यालयाने या प्रस्तावाचा आढावा घेऊन प्रस्ताव तयार केला आहे. सदरचा प्रस्ताव दोन पर्यायानुसार असून तो कार्यक्रम बाबीद्वारे संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत असल्याबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

सदर प्रस्तावावर चर्चा होऊन प्रस्तावास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली असून खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

**ठराव -**

असा ठराव करण्यात येतो की, खालील पर्याय, अटी व करारनाम्यानुसार, या प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात येत असून पुढील कार्यवाही करण्यांस सदस्य सचिवांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

**पर्याय क्रमांक (१)** डंकिन जलशुध्दीकरण केंद्र वगळुन रु. १,५५,००,०००/- वार्षिक .

**पर्याय क्रमांक (२)** डंकिन जलशुध्दीकरण केंद्र धरुन परंतु तेथील कर्मचारी वगळून रु.१,६०,००,०००/-

**अटी -**

१) मजीप्रा व नांदेड वाघाळा मनपा यांच्यामध्ये करावयाच्या करारनाम्याच्या मसुद्यास सदस्य सचिव मजीप्रा यांनी मान्यता द्यावी.

२) सदर कामासाठी दोन महिन्यांसाठी आवश्यक तो सर्व निधी उपलब्ध करुन देणे याची सर्वस्वी जबाबदारी नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेडची राहील.

३) निधीच्या अनुपलब्धतेमुळे, किंवा महानगरपालिका, नांदेडच्या बाजूने कोणत्याही कारणामुळे, पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्तीच्या कामात कांही व्यत्त्यय निर्माण झाल्यास त्याबाबतची सर्व जबाबदारी नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेडची राहील.

४) योजना कमीत कमी कर्मचाऱ्यांत चालविण्यांसाठी व Effective Control राहण्यांसाठी काही प्रमाणात ॲटोमेशन करावे लागेल व त्यासाठी थोडीफार गुंतवणुक मजीप्रास करावी लागेल.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

५) दोन महिन्यांची उचलही घेण्यांत यावी, मात्र महानगरपालिकेने विहित वेळेत मासिक देय रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास अदा न केल्यास महानगरपालिकेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे नोटीस देऊन करार संपुष्टात आणण्यात येईल, किंवा देय रकमेवर १५% दराने व्याज द्यावे लागेल.

६) उपरोक्त नमूद दोन्ही पर्यायासाठी दिलेल्या खर्चामध्ये, नंतरच्या वर्षात दरवर्षी अंदाजे १०% वाढ लागू राहील.

७) मिळणारा प्रोत्साहनात्मक लाभ (पॉवर फॅक्टर, टी.ओ.डी.किंवा गळती कमी करणे ) हा म.जी.प्रा.स देय राहील किंवा कोणतेही प्रोत्साहनात्मक लाभ न मिळता जास्तीचा खर्च झाल्यास म.जी.प्रा.च्या बीलातून वळती करावा लागेल.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

बैठकी समोर अन्य विषय नसल्याने उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर करण्यात आले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.